# वित्त विभाग
# Finance Department

## करार पद्धतीने तज्ञांची नियुक्ती करण्याबाबत जाहिरात

महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागामार्फत वित्तीय प्रशासन अधिक सक्षम, कार्यक्षम व परिणामकारक करण्याच्या उद्देशाने अनुक्रमे केंद्र पुरस्कृत योजनांचे समन्वयन, कर्ज व हमीचे व्यवस्थापन आणि राज्य सार्वजनिक उपक्रमांचे समन्वयन याकरिता नव्याने स्थापन करण्यात आलेल्या ASPIRE, BRIDGE आणि BEACON या विशेष कक्षांकरिता खालील पदांवर करार पद्धतीने तज्ञांची नियुक्ती करण्यात येणार असून, पात्र व इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

१. कर्ज व्यवस्थापन तज्ञ (BRIDGE कक्ष) - भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) अथवा सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमधून सेवानिवृत्त झालेले तसेच केंद्र शासन किंवा राज्य शासनाच्या कर्ज व्यवस्थापन क्षेत्रातील किमान १५ वर्षांचा अनुभव असलेले अधिकारी.

२. विधी तज्ञ - सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम व्यवस्थापन व विनिवेश (BEACON कक्ष) - एल.एल.बी./एल.एल.एम. पदवीधारक तसेच कंपनी कायदा, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचे पुनर्रचना (Restructuring) व विनिवेश (Divestment) विषयक किमान ५ वर्षांचा अनुभव असलेले उमेदवार.

३. वित्त मंत्रालय तज्ञ (ASPIRE कक्ष) :- भारत सरकारच्या उप सचिव किंवा त्यावरील स्तरावरील सेवानिवृत्त अधिकारी, ज्यांना भारत सरकारच्या वित्त मंत्रालयासह अन्य केंद्रीय मंत्रालये, निती आयोग इत्यादी संस्थांशी निधीचे व्यवस्थापन करण्यासंबंधी समन्वय साधण्याचा किमान १५ वर्षांचा अनुभव आहे.

क्षेत्रनिहाय तज्ञांचे पॅनेल (Sectoral Experts Panel) :- ऊर्जा, पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण व सेवा क्षेत्रासाठी प्रकरणनिहाय (Case-to-Case Basis) तज्ञांचे पॅनेल तयार करण्यात येत आहे. याकरिता शासन संस्था, बहुपक्षीय वित्तीय संस्था (Multilateral Banks), सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (PSUs) किंवा CRISIL/ICRA यांसारख्या पतमापन संस्थांमध्ये संबंधित क्षेत्रातील किमान १५ वर्षांचा अनुभव आवश्यक राहील.

पात्रता तसेच इतर सविस्तर माहिती finance.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज दि. २०.०७.२०२६ रोजी अथवा त्यापूर्वी ds.aspire@maharashtra.gov.in या ई-मेल पत्त्यावर सादर करावेत. अधिक माहितीसाठी इच्छुक ०२२-२२०२३०८५ या क्रमांकावर संपर्क करू शकतात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

अवर सचिव,

डीजीआयपीआर/२०२६-२७/१५०१ — वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

Mahabharti.in